नि.दि.दावा क्र.३२/२०२३
सुशिला वि. सहदेव
निशाणी क्र. ११७

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २ हरिदास ताराचंद ठाकरे -

<u>साक्षीदाराचा पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी.टी.गजवे यांच्यातर्फे</u>

४. प्रतिवादी साक्षीदार क्र.१ चा उलटतपास घेण्यापुर्वी, साक्षीदार क्र.२ चा उलटतपास हा सदर साक्षीदाराचे वय पाहुन आणि दोन्ही वकीलांची संमती असल्यामुळे, सदर साक्षीदाराचा सरतपास आणि उलटतपास हा साक्षीदार क्र.१ च्या आगोदर घेण्यात येत आहे.

५. माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला मराठी भाषेमध्ये समजावुन सांगण्यात आला. त्यावर मी वाचुन, समजुन त्यावर सही केली आहे.

६. साक्षीदाराला नि.११९ लगतचा विक्रीपत्राचा मुळ दस्त दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कागद हा विक्रीपत्राचा असुन त्यावर माझी आई मिराबाई ताराचंद ठाकरे हिचा अंगठा आणि माझी सही आहे. त्यातील मजकुर हा खरा व बरोबर आहे. आम्ही बाबुराव रामचंद्र शेंडे यांना शेतजमिन विक्री केली होती. सदर शेतजमिनीचा सर्वे नं.१३४/१/अ मधील जागा उत्तर दक्षीण ३० हात आणि पुर्व पश्चिम ५० हात अशी होती. सदर विक्रीपत्र हे २७/११/१९७३ रोजी आम्ही लिहून दिले होते. बाबुराव शेंडे यांना खरेदीपत्रानुसार जमिनीचा ताबा देण्यात आला होता आणि आज रोजी सदर मिळकतीवर शेंडे यांच्या कुटुंबियांचा ताबा आहे. सदर विक्रीपत्रास आर्टीकल 'अ' देण्यात येत आहे कारण सदर विक्रीपत्र हे नोंदणीकृत नाही.

७. साक्षीदाराला नि.१०९ आणि ११० वरील शपथपत्र दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की नि.क्र.१०९ वरील शपथपत्र माझ्या आईने आणि नि.११० वरील शपथपत्र मी केले होते. आईला मी घेवुन गेलो होतो. दोन्ही शपथपत्रातील मजकुर बरोबर आहे.
सरतपास पुर्ण.

<u>साक्षीदाराचा उलटतपास वादी तर्फे त्यांचे सुविज्ञ वकील श्री. आनंद गजभिये यांद्वारे -</u>

८. माझी शेती ही कोराड गावाला लागुन आहे. हे म्हणणे खरे नाही की सन २०१२ पुर्वी, माझ्या शेतीच्या उत्तर बाजुला मोकळी जागा होती आणि त्यानंतर लोकवस्ती होती. हे म्हणणे खरे

आहे की माझी शेती आणि कोराड गावची लोकवस्ती या दोन्हीमध्ये इतर कोणाची अथवा माझी शेतजमिन नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेतीच्या उत्तर बाजुला कोराड गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की पश्चिम बाजुला गावात जाणारा रस्ता आहे. माझ्या शेतामध्ये पाण्याची टाकी असुन ती जागा मी ग्रामपंचायतीला दान केली आहे. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायतीने मी दिलेल्या जागेत बनविलेल्या पाण्याच्या टाकीच्या शेजारी दुसरी पाण्याची टाकी बनविलेली आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की दुसरी टाकी बनवितांना माझी परवानगी घेतली नाही. मी आज रोजी दानपत्र आणले नाही. दुस-या टाकीच्या बांधकामाबाबत आक्षेप घेतल्याबाबतचा लेखी पुरावा माझ्याजवळ नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी यांनी पाण्याच्या टाकीला लागुन पक्के बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की पुर्वी बांधकाम हे कच्च्या स्वरुपाचे होते त्यानंतर प्रतिवादीने पक्क्या स्वरुपाचे बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या जमिनीतील एक हेक्टर जमिन ही शासनाने, लोकांना घरे बांधण्यासाठी संपादित केली आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर जागा ही माझ्या शेताच्या उत्तर बाजुकडील आहे आणि त्यासाठी माझ्या जमिनीमध्ये पुर्व-पश्चिम असा धुरा पाडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला मला मिळाला आहे. हे मला माहिती आहे की जमिनीची विक्री ही दुययम निबंधक कार्यालयात नोंदणी करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की नोंदणीकृत खरेदीपत्र मी बाबुराव शेंडे यांना करुन दिले नव्हते. हे मला माहिती आहे की प्रतिवादी आणि गावक-यामध्ये, प्रतिवादीच्या घराच्या बांधकामावरुन आणि मोकडया जागेवरुन वाद झाल्याचे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की शेंडे यांना मी आणि माझ्या आईने जागा विकल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी यांनी, शासनाने संपादित केलेल्या जागेच्या उत्तर बाजुस अतिक्रमण करुन घर बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या वडीलाच्या ताब्यात १९७३ पासुन जागा दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीच्या सांगण्यावरुन खोटे विक्रीपत्र बनविले असुन त्यांच्या सांगण्यावरुन खोटे शपथपत्र करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.01.16 11:29:45 +0530

दिनांक १४.०१.२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : Shri. R. J. Khobragade (Gr.-II)